VOL-01

Special Issue March 2018

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318



**Chief Editor**

Prof. Virag Gawande

Published By
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

28) PERPLEX WOMAN OF 21ST CENTURY IN SHASHIDESHPANDE'S .....
**Prof. Ashish Dadarao Deoorkar** || 107

29) जागतिकीकरणात २१ व्या शतकातील महिलांपुढील आव्हाने-एक समाजशास्त्रीय अध्ययन
प्रा. डॉ. सुधा मु.खडके (कडू) || 110

30) जागतिकीकरणात आदिवासी कविता
प्रा. नितीन जगदिश टेकाम || 113

31) २१ व्या शतकातील भारतीय महिला व कर्तृत्व
प्रा. गजानन सोडनर || 116

32) जागतिकीकरणात संतानी केलेल्या समाज प्रबोधनाचे महत्व
लाभसेटवार एन.एस. || 120

33) जागतिकीकरणाचा भारतीय स्त्रियांवरील प्रभावाचा अभ्यास
प्रा. अरुण शेंडे || 124

34) जागतिक पर्यावरण
प्रा.डॉ उल्हास एन राठोड || 128

35) ग्रामीण विकासात शेती आधारित प्रक्रिया उद्योगांची भूमिका
प्रा. डॉ. नागोराव के. सोरे || 132

36) भारतीय अर्थव्यवस्था आणि जागतिकिकरण
प्रा. डॉ. दिपक भास्करराव कुटे || 136

37) जागतिकीकरण आणि भाष्कर चंदणशिव यांची कथा
प्रा. डॉ. अन्नपुर्णा अजाबराव चौधरी || 139

38) जागतिकीकरण आणि भारतावर वाढलेला विदेशी कर्जाचे ओझे
प्रा. डॉ. राधेशाम पी. चौधरी, जि. यवतमाळ || 143

39) SEASONAL VARIATION IN TEMPERATURE AND DISSOLVED OXYGEN IN RIVER KHUNI ...
SUJATA.H.SHENDE, DIST YAVATMAL, MAHARASHTRA. || 146

http://www.vidyawarta.blogspot.com _ https://sites.google.com/site/vidyawartajournal

सुमेध प्रकाशन, पुणे.
४. इंगळे दादासाहेब - जागतिकीकरण भारतापुढील आव्हान, धम्मदिना प्रकाशन, पुणे.
५. बनसोडे प्रशांत - जागतिकीकरण शेतकऱ्यांच्या आत्महत्या, डायमंड प्रकाशन, पुणे.
६. मुकुंद गायकवाड - जागतिकीकरण शाप नव्हे वरदान, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.
७. पद्माकर दुभाषी - जागतिकीकरण, उदारीकरण व अर्थकारण, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
८. लोकराज्य मासिक - संपादक, मुंबई.
९. नलिनी पंडीत- जागतिकीकरण भारत लोकवाड्मय, मुंबई.
१०. इंटरनेटवरील माहिती.
११. श्रीनिवास जोशी- वेद जागतिकीकरणाचा, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
१२. Rani Narmda -Impact of globalization of India Agriculture vol-३.
१३. यु.जी.सी. पुरस्कृत जर्नल्स.

❑❑❑

30

# जागतिकीकरणात आदिवासी कविता

प्रा. नितीन जगदिश टेकाम
सहाय्यक प्राध्यापक,
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महा., पांढरकवडा

**********

एकोनिसशे साठ पासून मराठी साहित्याच्या प्रवाहात वेगवेगळे साहित्य प्रवाह जन्माला आले. त्यात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवाही साहित्य, आदिवासी साहित्य या वेगवेगळया प्रवाहांनी आप—आपल्या जीवन जाणीवा मांडायला सुरवात केली. त्या त्या प्रवाहांच्या अभिव्यक्तीतून समाजात स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचे कार्यही या चळवळीने केले. या चळवळींच्या माध्यमातून समाजातल्या जाचक प्रश्नांना वाट करून देण्याचे कार्यही या चळवळीने केले. १८ व्या शतकात ज्या मोठ—मोठया राज्यक्रांत्या, उलाढाल्या झाल्या त्याचा परिणाम या वनपुत्रावर झाला. आदिवासी जंगल जिव्हाऱ्यातून, दऱ्याखोऱ्यातून वास्तव्य सोडून नागरी जीवनात वास्तव्य करण्यास आला आणि त्यातून स्वत:चा आत्मशोध घेऊ लागला. रानाबनात होणारे आदिवासींचे शोषण, निसर्गनिष्ठ संस्कृती, त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरा या सर्वांचा अभ्यास, संशोधन समाजशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांनी केला आणि त्यांनी केलेले संशोधन मराठी माणसापर्यंत पोहचू लागले. मराठीत आदिवासी आणि आदिवासीऐंतरांनी काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथन वैचारिक लेखनाच्या माध्यमातून आदिवासींच्या जीवनमुल्यांविषयी मोठया प्रमाणात लिखान केले ते साहित्य आदिवासी साहित्य म्हणून ओळखल्या जावू लागले. डॉ. विनायक तुमराम आदिवासी साहित्याविषयी आपले मत मांडतांना म्हणतात की, '' आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग आहे. रानाबनातील वंचितांचे ते साहित्य आहे.

त्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे साहित्य आहे. ज्यांच्या आक्रोश्याला इथल्या समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही. अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांती साहित्य आहे. येथल्या क्रूर कठोर न्यायव्यवस्थेने त्यांच्या शेकडो पिडयांना आजीवन वनवास ठोठावला. त्या आदिम समुहाचे ते मुक्तिसाहित्य आहे. एकंदरीत या व्याख्येतून प्रस्तापित समाजव्यवस्थेनी दिलेली दुय्यम वागणूक आणि त्या व्यवस्थेने या वनपुत्रांना हीन लेखलेले आहे. याचेही विवेचन डॉ. विनायक तुमराम करतात. मुळात हे साहित्य गावकुसाच्या बाहेर जंगल जिव्हाऱ्यात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या विविध जाती—जमातीचे क्रांतीसाहित्य म्हणावे लागेल.

भारतातही जागतिकीकरणाचे वारे अलीकडे वाहू लागले तरी पूर्वी जागतिकीकरणांचा विचार वेगवेगळया धार्मिक ग्रंथांमधून व्यक्त झाला. जागतिकीकरण म्हणजे जगातील सर्वच देशांना काही मूठभर धनाढय आणि बलाढय देशांनी घ्यायला लावलेल्या निर्णयांमुळे बदललेले अर्थकारण होय. अर्थकारण बदलले तर बराच बदल घडून येत असतो. त्याचा प्रभाव समाजकारण आणि राजकारणावर पडतो. परदेशी कंपन्याचा माल जर बाजारात आला तर देशी उद्योगधंदे पडू लागतात. याचा परिणाम केवळ ग्रामीण, शहरी भागावरच होत नाही तर जंगलजिव्हाऱ्यात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या वनपुत्रांवरही होतो. जागतिकीकरणामुळे घडवून आणलेल्या खऱ्या अर्थाने लादलेल्या संकल्पना आणि त्यामूळे बदललेले जीवनमुल्य साहित्यात उतरायला लागतात. स्वातंत्र्यानंतरही विकासापासून कोसो दूर गिरीकुंदरात, रानाबनात जीवन जगणाऱ्या आदिवासी साहित्यातील नव्या जाणीवा उमटायला लागली. खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाने या वनपुत्रांची कुटुंब व्यवस्था, समाजव्यवस्था रूढी, प्रथा, परंपरा कशी उध्वस्त झाली याचेही विदारक चित्रण साहित्यात येते. जागतिकीकरणाने आदिवासीचे अस्तित्वच उध्वस्त करण्यात आलेले दिसते. जल, जंगल, जमीण हे सरकारच्या ताब्यात गेल्या आणि जबरदस्तीने या भूमीच्या मालकाला, इथल्या आद्य वसाहतगाराला 'वनवासी' करण्यात आले. हा विषय मराठीत बऱ्याच आदिवासी आणि आदिवासीऐतरांनी हा विषय मांडला. काव्य, कथा, कादंबरी आत्मकथनाच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न, समस्या समाजापर्यंत पोहचविण्याचा हा प्रयत्न त्यांनी केला. आदिवासी कवी म्हणून ज्या नावाचा उल्लेख केला जातो. त्यात प्रामुख्याने डॉ. गोविंद गारे, वाहरू सोनवणे,भुजंग मेश्राम, डॉ. विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, प्रा. वामन शेडमाके, चामुलाल राठवा, प्रा. माधव सरकुंडे, दशरथ मडावी, सुनिल कुमरे, वसंत कन्नाके, प्रभू राजगडकर, प्रा. विनोद कुमरे, प्रा. संजय लोहकरे या सारख्याकवी लेखकांच्या साहित्यांचा विचार करता येईल.

भारताला स्वातंत्र मिळून कितीतरी वर्षे झाली. पण आजही हा वनपुत्र त्याच स्थितीत खितपत पडलेला दिसतो. त्यांची अजूनही घर मातीची, अजून घर गवताचे, अजूनही संसार गाडग्या, मडक्यावर, आजही अंधकाराच्या गर्तेत सापडलेले समाजविश्व दिसतात. रोजीचा रोटीचा सवाल रोजचाचं आणि पोटापाण्यासाठी रानोरान फिरणारी उघडी नागडी माणूसं पाहिले की, भारत नेमका कुठे चालला, जग कुठे चाललय आणि आपण काय करतोय? तोच नेमका प्रश्न पडतो. आदिवासी साहित्यात वाहरू सोनवणे यांच्या गोधड (१९८७) या काव्यसंग्रहातून वेगवेगळया जीवन जाणीवा रेखाटलेल्या दिसतात. जागतिकीकरणाच्या नावाने जेव्हा वेगवेगळे अभयारण्य निर्माण केले जातात. तेव्हा येणारे पर्यटक जंगलजिव्हाऱ्यात राहणाऱ्या या स्त्रियांवर कशा पध्दतीने अत्याचार करतात. त्याच वर्णन करतांना ते म्हणतात की,

"एक वस्तु अशी
तिला वाटेत घाटेत
सापडले तेथे रोखावं
मनात आले तर मिठीत घ्यावं
हौस फिटली तर सोडून द्यावं
हाक नाही बोंब नाही "

वाहरू सोनवणे यांनी रेखाटलेली आदिवासी स्त्री ही सावकारी, वनअधिकारी यांच्या जाळयात सापडणारी स्त्री तिच्यावर समाजात होणारे शोषण अत्याचार ग्रस्त जीवन यामुळे तिच्या जीवनाची होणारी ससेहोलपट, तिच्यावर होणाऱ्या अत्याचारामुळे

आयुष्याची झालेली राखरांगोळी कवितेत मांडतात. शोषणग्रस्त विश्व वाहरूनी आपल्या कवितेतून मांडलेले आहे. भुजंग मेश्राम 'उलगुलान' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून असचं जीवनविश्व आपल्या कवितेतून कोरलं आहे. स्वातंत्र्यानंतरही हा समाज गुलामगिरीच्या खाईत लोटला जात आहे. आपलचं जल, जमीन, जंगलावर ताबा मिळविणाऱ्या षड्यंत्रात हा आदिवासी पिचला जातं आहे. आपल्या स्वत:च्या मालकीची जागा बळकावण्याचा प्रयत्नही स्वार्थी शासन व्यवस्था कशी करते हेही दिसून येते. सरकारने राबवलेली नर्मदा योजना या योजनेच्या माध्यमातून आदिवासीच्या विस्थापनाचा प्रश्न ही ज्या पध्दतीने रंगवला तोही महत्वाचा आहे. नर्मदेच्या खोऱ्यात आपलं जीवन रंगविणारा समाज गुण्या गोविंदाने नांदत होता. पण सरकारच्या धोरणामुळे, कितीतरी कुटुंब उध्वस्त होतात. फुललेल्या कुटुंबाचे पंख छाटली जातात जेव्हा या योजनाचा प्रतिकार केला जातो. तेव्हा त्यांना नक्षलवादी, दरोडेखोर म्हणून मारल्या जातात. आदिवासींना वाचवण्यासाठी निसर्गांनी नटलेली ही संस्कृती वाचवण्यासाठी जी उपरी माणसे जेव्हा समोर येतात ती कशी असतात? त्याचा स्वार्थीपणा भुजंग मेश्रामांनी रेखाटलेला दिसतो. ते म्हणतात की,

"जंगलातले ठेकेदार पेरतात पर्यावरणी चळवळ
गंगेच्या व्यभिचारी पोटात होते मळमळ
चिपकून चिपकून घाट वाचतांना
फ्रंटपेजवर त्यांची बांधिलकी कळकळ
आम्ही कितीही पेटवले रान
तरी ठरतो फुटकळ "

खऱ्या अर्थाने हे जंगलजिव्हारा वाचवण्यासाठी आदिवासीऐतरांना वारेमाप प्रसिध्दी मिळाल्या जाते पण ज्यांनी आपलं रक्त आटवले, प्रस्तापित समाजा विरूध्द बंड उभारलं, विद्रोह केला त्याची साधी दखलही ही व्यवस्था घेत नाही ही खंतही व्यक्त करतात. विकासाच्या नावाने प्रकल्प राबवले जातात पण या विकासांच्या प्रकल्पांतून या वनपुत्राच्या विनाशातून देशाचा विकास हे देशविकासाचे सुत्र बनले आहे. चामुंडलाल राठवा यांचा 'धरण आणि मरण' ही कविता महत्वपूर्ण वाटते. नर्मदा, इंदिरा, सरदार सरोवर, उकाई इ. प्रकल्पाच्या माध्यमातून प्रस्तापित समाजव्यवस्थेवर ताशेरे ओढतात म्हणतात की,

' प्रकल्प ?
इतरांचा कायाकल्प
आमचा मरण संकल्प'

खऱ्या अर्थाने या स्वातंत्रतेणे इथल्या आदिम जीवांची मांडीही झाकता आली नाही. पारतंत्र्यापेक्षा स्वातंत्र्याने आदिमांच्या जीवनात डुंकूनही पाहिले नाही. अशी संवेदना प्रकट होते.'आदिवासी लिलावाचा प्रजासत्ताक देश' हा प्रा. डॉ. संजय लोहकरे यांचा काव्यसंग्रही तीतकाच महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षानंतरही स्वातंत्र्यांदिनी नारायण गावच्या स्टॅंडवर लिलावात विकल्या जाणाऱ्या आमच्याच लोकप्रतिनिधीनी लाचार आणि गुलाम बनविलेल्या समाज विश्वाचं वर्णन त्यात रेखाटलं. प्रा. डॉ. लोहकरे सरांनी कवितेचं शिर्षकचं ' आदिवासी लिलावाचा प्रजासत्ताक देश' ही कविता अशी की,

"प्रजासत्ताक दिनालाच बा नं
मायलान मला देसात नेला
मी आसनसोळावर्षाचा
मायचं प्वाट खपाटीला
आन् बाझिंगून झिंगून खंगलेला
मी म्हणलं आरे बा, आज तं प्रजासत्ताक दिन
बेल्हयाचा बाजार सुदीक बंद असन
तव्हा बा न गाव देवाला हात जोडलं
आन तोंडातल्या तोंडात पुटपुटला
बेल्हयाचा बाजार बंद असलात आसुंदे
पण नारायण गावाचा माणसाचा बाजार मातर
तेजीत चालू दे"

स्वातंत्र्यानंतर पोटाची खळगी भरण्यासाठी स्वत:ला लिलावात विकण्याची वेळ या आदिवासींवर येत आहे. ही फार मोठी शोकांतिका भारतीय समाज व्यवस्थेची आहे. स्वातंत्र्य मिळूनही कितीतरी वर्षे आली तरी इथल्या भूमीच्या मालकांसाठी विकासाचे आराखडे मांडत असतांना आदिवासींना विकासांचे गांजरंच दाखवून त्यांचा शारीरिक, माणसिक, आर्थिक दृष्टया या वनपुत्राची लुबाडणूक केल्या जात असल्याचे जाणवते. जागतिकीकरणाचा आदिवासी साहित्यावर झालेल्या

परिणामाविषयी प्रा. डॉ. संजय लोहकरे आपल मत मांडतांना म्हणतात की, 'जागतिकीकरणाच्या, ग्लोबलायझेशनच्या कोलाहलात कविताच काय? पण सर्वच कला निसर्गवादाकडून पूंजीवादाकडे वाटचाल करीत आहेत. कला ही कलेसाठी नसून आर्थिक संपन्नतेसाठी विचार म्हणजे कलेची ठेकेदारी होय. खरं तर कोणतीही कविता किंवा कलाकृती आपल्या स्मृती, कल्पना,संवेदना जीवनमूल्यांचा प्रचार, प्रसार करण्यासाठी निर्माण होतात. पण जागतिकीकरणाने सर्वांना गिळंकृत केले आहे. त्यातील कलामुल्य नष्ट होऊन अर्थमुल्य गृहित धरल्या जात आहेत. त्यातून येणारी पिढी या कवितेकडे या कोणत्या दृष्टीकोनातून पाहणार आहे. हा आजच्या कलाकारापूढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.'

एकंदरीत विचार केला तर जागतिकीकरणाच्या या युगात संपूर्ण जगाचे समिकरणचं बदलून गेले. त्याचा प्रभाव ग्रामीण, नागर, आणि त्याचबरोबर ग्रामीण भागापासून दूर जंगलजिव्हाऱ्यात राहणाऱ्या वनपुत्रावरही त्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. समाजशास्त्रीय समिक्षेचे जनक तेन म्हणतात की, ' साहित्य हे समाजपरिस्थितंच अपत्य आहे' साहित्यावर समाजाचा प्रभाव पडत असतो. समाज बदलेला तर साहित्य बदलते. साहित्यातील मर्म, रंग, ढंग बदलत असतो. जागतिकीकरणाने आदिवासीच्या जल, जंगल, जमिनी बळकावल्या प्रकल्पाच्या नावाने, विकासाच्या नावाने, शोषण, लुट, अत्याचार त्यांची जी मुल नैसर्गिक संस्कृतीचा ऱ्हास, वनाचा ऱ्हास, नक्षलवाद, रूढी, प्रथा, परंपरा, भाषा या गोष्टी मामशेष होतांना दिसतात. अस म्हणावं लागेल.

**संदर्भ सूची**

१. आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन — प्रा. डॉ. विनायक तुमराम, स्वरूप प्रकाशन, पहिली आवृत्ती १५ नोव्हेंबर २०१२.

२. आदिवासी साहित्य एक अभ्यास, डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, स्वरूप प्रकाशन, पहिली आवृत्ती २०१३.

३. आदिवासींच्या लिवावांचा प्रजासत्ताक देश (कवितासंग्रह), डॉ. संजय लोहकरे, दिलीपराज प्रकाशन पूणे, प्रथम आवृत्ती २०१५.

४. फडकी (मासिक), संपा. डॉ. संजय लोहकरे, १५ डिसेंबर, २०१७.

31

# २१ व्या शतकातील भारतीय महिला व कर्तृत्व

प्रा. गजानन सोडनर ,
इतिहास विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोरेगांव

**********

भारतीय संस्कृतीमध्ये पुरूषांना अधिक महत्व दिले जाते म्हणून या संस्कृतीला पुरूष प्रधान संस्कृती असे म्हणतात. पुरूष प्रधान संस्कृतीचा पगडा भारतीय समाजावर असला तरी जेव्हा जेव्हा आपले कर्तृत्व सिध्द करण्याची संधी स्त्रीयांना मिळाली तेव्हा त्यांनी आपले कर्तृत्व सिध्द करून पुरूषी संस्कृतीमध्ये स्त्रीयांचा मानसन्मान वाढविला, भारताच्या प्राचीन काळापासून तर आधूनिक काळापर्यंत स्त्रियांचा सहभाग व कर्तृत्व वेगवेगळ्या क्षेत्रात बघायला मिळते. संबंधीत संशोधनात २१ व्या शतकात स्त्री कशी आहे यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्राचीन काळातील स्त्री व कर्तृत्व**

प्राचीन काळात स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. परंतु त्यांना आपले कर्तृत्व फार मोठ्या प्रमाणावर दाखविता आले नाही. परंतु शैक्षणीक क्षेत्रात व विद्वत्तेच्या क्षेत्रात स्त्रियांनी उतुंग भरारी मारली होती. प्राचीन काळात अनेक विद्वान स्त्रिया होऊन गेल्यात त्यामध्ये अपाला घोषा, विश्ववारा, अत्रेयी, रात्री, जरिता, श्रध्दा कामायनी, इन्द्रामा गोधा, रोमशा, लोपामुद्रा, अपाला, यमी, मार्गी, मैत्रयी, ह्या प्रमुख विद्वान स्त्रिया होय. या स्त्रियांनी ऋग्वेद ग्रंथातील १० व्या मंडलातील अनेक ऋचांची निर्मिती केली आहे तसेच पाचव्या ते आठव्या मंडळात सुध्दा या स्त्रियांनी रचलेल्या ऋचा आहें

प्राचीन काळातील स्त्रियांचा दर्जा दर्शविणारे वर्णन शतपथ ब्राम्हण ग्रंथात आले आहे. या ग्रंथात